ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172

**No,CGRF/AZ/U/102/2008/23 Date**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Umesh Madhaurao Dolare, Near Nath Mandir, Aurangpura, Aurangabad.

**Dear Sir**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Umesh Madhaurao Dolare, Near Nath Mandir,Aurangpura, Aurangabad** (Consumer No. 490011760471).

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

. **The hearing of the grievance is fixed on date 13.05.2008 at 11.00 Hrs.**

You are also requested to be present along with the concerned in charge at the time of hearing.

**Encl As above**.

Copy to:-
**Shri Umesh Madhaurao Dolare,**
**Near Nath Mandir, Aurangpura,**
**Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/१०२/२००८/२३**

**तक्रार दाखल दिनांक ;-२२/०४/२००८**
**निकाल दिनांक ;- २७/०५/२००८**

**श्री, उमेश माधवराव डोलारे,**
**नाथ मंदिरा समोर औरंगपुरा,**
**औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार

दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक २२/०४/२००८ रोजी दाखल केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक २२/०४/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले.

१) ग्राहकाने दाखल केलल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्याने महावितरण वीज कंपनीकडे वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा मिळण्याबाबत दिनांक १४/०९/२००६ रोजी अर्ज केला. महावितरण कंपनीच्या संबंधीत कार्यालयातुन त्याला रूपये ८००१/- चे कोटेशन देण्यात आले ज्यात रू ४०००/- हे सर्व्हीस लाईन चार्जेस म्हणुन समाविष्ट करण्यात आले होते. अर्जदाराने कोटेशनची पुर्ण रक्कम रूपये ८००१/-हे ११/१०/२००६ रोजी भरली. अर्जदाराच्या तक्रारीनुसार त्यांच्याकडुन घेण्यात आलेले सर्व्हीस लाईन चार्जेस हे रद्द करण्यात आल्यामुळे ते त्यांना परत देण्यात, अनेक वेळा स्मरणप्रत्र देवुनसुध्दा महावितरण कंपनी टाळाटाळ करीत आहे.सदरील रक्कम परत देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक १३/०५/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री उमेश डोलारे हजर होते. नोडल अधिकारी श्री एस. जी. पवार यांनी संबंधीत विभागाकडुन कागदपत्रे न मिळाल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढवण्याची विनंती केली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करून पुढील सुनावणी २०/०५/२००८ रोजी घेण्याचे निश्चत केले

३) दिनांक २०/०५/२००८ रोजी सूनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जबाब मंचात दाखल केला. त्यांनी अर्जदारास सर्व्हीस लाईन चार्जेस म्हणुन घेतलेले रूपये ४०००/- वीज बिलात क्रेडीट देण्यास तयार असल्याचे सांगितले अर्जदाराने त्याचे मासीक वीज बिल हे अंत्यत कमी असल्यामुळे रक्कम ही बिलात क्रेडीट न देता चेकद्वारे देण्याबाबत आदेश देण्याची विंनंती मंचास केली.

४) मंचास अर्जदाराचे मासीक बिल हे अंत्यत कमी असल्यामुळे परतफेड करावयाची रक्कम वीज बिलात क्रेडीट केली तर पुढील अनेक महीने अर्जदारास वीज बिल भरावे लागणार नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर अर्जदाराची चेकद्वारे रक्कम परत करण्याची मागणी मान्य केली.

मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदाराकडुन सर्व्हीस लाईन चार्जेस म्हणुन घेतलेली रक्कम रूपये ४०००/- ही ३० दिवसाच्या आत चेकद्वारे परत करावी.

२) रक्कम स्विकारलेल्या तारखेपासुन म्हणजेच ११/१०/२००६ ते चेक देण्यात येणा-या तारखेपर्यंत अर्जदारास द.सा.द.शे. ६/ व्याज दर द्यावा.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/यु/१०२/२००८/२३** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्री, उमेश माधवराव डोलारे,**
**नाथ मंदिरा समोर औरंगपुरा,**
**औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/१०२/२००८/२३
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**